साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २२ वा | सोमवार, दि. १५/०६/२०२६ ते दि. २१/०६/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## लातूर जिल्ह्यातील बोंबळीच्या गायकवाड कुटुंबीयांना दिलासा
## मुख्यमंत्री यांच्याकडून आर्थिक सहाय्यासह, शेतकऱ्याला मिळाला बैल

मुंबई – वीज पडून बैल दगावल्याने जोखडाला पत्नीला जुंपण्याची वेळ आलेल्या लातूर जिल्ह्यातील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्या व्यथेची दखल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, अन् या शेतकरी कुटुंबाला अवघ्या काही तासात बैल आणि दगावलेल्या बैलाच्या नुकसान भरपाई पोटीची रक्कम मिळाली. यात मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश आणि जिल्हा प्रशासनासोबतच, अन्य विभागांनी दाखवलेली संवेदनशीलता चर्चेची ठरली आहे. या संवेदनशीलतेमुळे आता काशिनाथ गायकवाड यांना पत्नीला बैलाच्या जागी जुंपावे लागणार नसल्याने, या कष्टकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्दचे काशिनाथ गायकवाड भूमिहीन शेतकरी असून त्यांच्याकडे असलेल्या बैलजोडीच्या मदतीने गायकवाड व त्यांच्या पत्नी हौसाबाई परिसरातील शेतकऱ्यांची जमीन कसतात. मशागतीची, नांगरणी ते पेरणी, वखरणी अशी मिळेल ती कामे करतात, यावरच त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. यातच त्यांच्याकडील एका बैलाचा शुक्रवारी (५ जून) झालेल्या वादळी पावसात वीज पडून मृत्यू झाला. त्यामुळे मिळालेली कामे पूर्ण करण्यासाठी, गायकवाड यांना पत्नी हौसाबाई यांना जोखडला जुंपावे लागल्याचे वृत्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहचले. यावर त्यांनी मुख्यमंत्री सचिवालयाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानुसार प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्या संपर्कात राहून, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांना महसूलसह, सर्व यंत्रणांना गायकवाड यांना तत्काळ मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तहसील कार्यालयासह, पशूसंवर्धन, कृषी सर्व यंत्रणा गायकवाड यांच्यापर्यंत पोहचल्या. पशूसंवर्धन विभागाने एक बैल उपलब्ध करून घेतला आणि तो जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड, तहसिलदार सोमनाथ वाडकर यांच्यासह पशूसंवर्धन विभागाचे अधिकारी आर्दीच्या उपस्थितीत थेट गायकवाड कुटुंबीयांकडे सुपूर्द केला. यामुळे काशिनाथ गायकवाड यांच्यासह, त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने दखल घेत, बैल मिळवून दिल्याने गायकवाड यांच्या पत्नी हौसाबाई आणि मुलगा पुंडलिक यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह, जिल्हा प्रशासनाचेही आभार मानले. हौसाबाई म्हणाल्या, आमच्या एका बैलाचा वीज पडून मृत्यू झाल्याने दुर्दैवाने आमच्यावर अशी वेळ आली. पण आमच्या अडचणीची दखल घेऊन, लगेचच मदत मिळाल्याने बरे वाटले. आता पुढे येणाऱ्या खरीप हंगामासाठी मिळालेली कामे पूर्ण करण्याची चिंता दूर झाली. बैल पण चांगला मिळाला आहे. आता त्याची पण चांगली काळजी घेऊ आणि मिळालेली कामे देखील चांगली होतील असे बघू. नैसर्गिक आपत्तीमध्ये जनावरांचा मृत्यू झाल्यास राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून तातडीने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. गायकवाड यांच्या दगावलेल्या बैलाचा तातडीने पंचनामा आणि शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून नियमानुसार आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम गायकवाड यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

## धुळ्यात १६ जूनरोजी डाक अदालतीचे आयोजन

धुळे (जिमाका) – प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग, धुळे क्षेत्रासंबंधित टपाल सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्याच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल. अशा तक्रारींची दखल घेण्यासाठी १६ जून, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे येथे तिमाही डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

डाक अदालतीत टपाल, स्पीड पोस्ट, काउन्टर सेवा, डाक वस्तू पार्सल, बचत बँक खाते व मनीऑर्डर अशा सेवेबाबतच्या तक्रारींचा समावेश असेल. तक्रारीचा उल्लेख सर्व तपशिलासह केलेला असावा. उदा. तारीख व ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविलेली असेल त्याचे नाव व हुद्दा व तक्रार पाठविल्याच्या तपशिलासह संबंधितांनी डाक सेवेबाबतची आपली तक्रार प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग, धुळे ४२४ ००१ यांचेकडे दि.१२ जून, २०२६ पर्यंत अतिरिक्त प्रतीसह अथवा तत्पुर्वी पोहोचेल अशा बेताने पाठवावी. असेही प्रवर अधिक्षक डाकघर, धुळे विभाग यांनी कळविले आहे.

### महसुली दाखले मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ
## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अंमलबजावणीत धुळे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

धुळे (जिमाका) – राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने शासन निर्णयांद्वारे महसूल विभागामार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवांच्या प्रक्रियेत सुलभीकरण केले असून नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करण्यात आली आहे. शासनाच्या Governance Process Re-engineering (GPR) उपक्रमांतर्गत अर्ज प्रक्रिया, मंजुरीचे स्तर तसेच प्रमाणपत्रांच्या नमुन्यांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे, अशी माहिती सचिव, जिल्हा सेतू समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी दिली आहे. लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत एप्रिल २०२६ पासून आजपर्यंत धुळे जिल्ह्यात एकूण २ लाख २३ हजार २०३ अर्ज ऑनलाइन प्राप्त झाले असून त्यापैकी १ लाख ९९ हजार ४३७ अर्जदारांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. यामधील १ लाख ९१ हजार ४३७ सेवा कालमर्यादेत देण्यात आल्या आहेत. या कामगिरीमुळे धुळे जिल्हा राज्यात दुसऱ्या, तर नाशिक विभागात प्रथम क्रमांकावर आहे.

सेवांच्या सुलभीकरणामध्ये शपथपत्राचा नमुना, वय-राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, भूमिहीन प्रमाणपत्र, अल्पभूधारक प्रमाणपत्र, भूमापन अभिलेखाची प्रमाणित प्रत, जातीचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, मायग्रंट कास्ट सर्टिफिकेट आदी सेवांचा समावेश आहे. या सेवांसाठी आवश्यक अर्ज, कागदपत्रे व प्रमाणपत्रांचे नमुने 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

नागरिकांना सदर प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणेकामी Proof of Address (PoA) Prooh of Identity (PoI) व सेवा संबंधी आवश्यक कागदपत्रांव्दारे महसुली प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच प्रमाणपत्राच्या नमुन्यात सुधारणा करण्यात आली असुन प्रमाणपत्रांच्या नमुन्यात केलेल्या सुधारणांमुळे प्रमाणपत्रांवर लाभार्थ्यांचे फोटो व प्रमाणपत्राची पडताळणी करणेकामी क्यूआर कोड येत आहे. तसेच सदर पोर्टलवर नागरिकांना महसुली प्रमाणपत्रांसाठी नागरीक लॉग इनव्दारे देखील सुलभपणे सेवा उपलब्ध करुन देणेकामी सुधारणा करण्यात आली आहे. आता नागरिक स्वतः त्यांचे लॉगइन तयार करुन अर्ज करु शकतात. तसेच पोर्टलवर अर्जासोबत स्वतंत्रपणे **(पान ३ वर)**

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम प्रशासकीय विभागांनी विहित कालावधीत सेवा द्यावी–राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवा संबंधित प्रशासकीय विभागांनी विहित केलेल्या कालावधीत नागरिकांना सेवा द्यावी, असे निर्देश राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन सभागृहात महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, राज्य लोकसेवा हक्क आयोग कार्यालयाचे उपसचिव ध.र.पुराडउपाध्ये, कक्ष अधिकारी सचिन पोतदार, आरटीएसचे नोडल अधिकारी राहुल वाघ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती कुलकर्णी म्हणाल्या की, राज्यातील नागरिकांना पारदर्शक व कार्यक्षमतेने लोकसेवा देण्याच्या उद्देशाने शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कायदा अंमलात आणला आहे. या अधिनियमाच्या माध्यमातून नागरिकांना विहित कालावधीमध्ये लोकसेवा पुरविण्याची तरतूद करण्यात आली असल्याने त्याप्रमाणे नागरिकांना अधिसूचित सेवा विहीत कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्याव्यात. सेवा हमी देणाऱ्या विभागांनी प्रलंबित प्रकरणाचा त्वरित निपटारा करावा. लोकसेवा हक्क अधिनियमानुसार सेवा देणाऱ्या अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एकदा डॅशबोर्डवर आलेल्या अर्जांची व अपिलांची पडताळणी करावी.

अपीलधारकांना अपिलासाठी किमान ७ दिवसांपुर्वी नोटीस देण्यात यावी. अपिलांचा विहीत कालावधीत निपटारा करावा. सेवा देताना अडचणी असल्यास तांत्रिक सहकाऱ्यांशी संपर्क साधावा. कायद्याच्या तरतुदीनुसार सेवाची सुविधा नागरिकांना सुलभ उपलब्ध करुन द्यावी. सर्व ग्रामपंचायतीमध्ये सेवा हक्क अधिनियमान्वये ऑनलाइन सेवा उपलब्ध करुन द्याव्यात. महानगरपालिकेने डॅशबोर्ड अद्ययावत करावा. ज्या सेवा ऑनलाइन उपलब्ध नाहीत, अशा सेवा ऑनलाइन उपलब्ध करुन द्याव्यात. सर्व विभागानी आपले मानांकन वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. राज्य सेवा हक्क अंमलबजावणीत धुळे जिल्ह्याने राज्यात दुसरा क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांनी सर्व विभाग प्रमुखांचे अभिनंदन केले व प्रथम क्रमांकासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, लोकसेवा हक्क अधिनियमान्वये सेवा देण्याची जबाबदारी संबंधित विभागाची आहे. त्यामुळे नागरिकांना विहित मुदतीत १०० टक्के सेवा देण्यात यावी. सर्व विभागानी जिल्हा, तालुकास्तरावर आपले मानांकन वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी जिल्ह्यातील सर्व विभागाची लोकसेवा हक्क अधिनियम २०२५ अंतर्गत निकाली अर्ज, अपिले व प्रलंबित अर्जाची माहिती माहिती सादरीकरणाद्वारे मांडली.

# रात्रभर जागणारी पिढी आणि गप्प होत चाललेले पालक

विशेष लेख...

रात्रीचे एक दोन वाजलेले असतात. घरातले सगळे दिवे बंद असतात. फक्त एका खोलीतून थोडासा अंधुकस लाइट बाहेर पडत असतो. आईला मधेच जाग आलेली असते. ती उठते, पाणी पिते आणि सहज मुलाच्या किंवा मुलीच्या खोलीत डोकावून पाहते. हातात मोबाईल असतो. कानात इयरफोन. स्क्रीनवर काहीतरी सुरू असतं. वेळेचं भान हरवलेलं असतं. अजून झोपला नाहीस?आईचा प्रश्न.हो ना पाच मिनिटांत झोपतो.हे पाच मिनिटं मग एक तास होतात. दोन तास होतात. आणि शेवटी रात्र संपते. हे दृश्य आज अनेक घरांमध्ये रोज घडतं आहे. सकाळी दहा-अकरा वाजेपर्यंत झोप. उठल्यावर चहा हातात आणि पुन्हा मोबाईल. शरीर जागं झालेलं असतं, पण दिवसाची लय हरवलेली असते. रात्रभर जागणं, सकाळी उशिरा उठणं, दिवसाची सुरुवातच दुपारच्या सुमारास होणं आणि मग पुन्हा रात्री उशिरापर्यंत मोबाईल, लॅपटॉप किंवा स्क्रीनसमोर बसणं हे अनेक मुलांचं रूटीन बनलं आहे. काळ बदलला आहे, तंत्रज्ञान बदललं आहे, जीवनशैली बदलली आहे. हे सगळं मान्य आहे. पण माणसाच्या शरीराच्या गरजा बदललेल्या नाहीत. शरीराला विश्रांती हवीच असते. मनाला शांत झोप हवीच असते. डोळ्यांना अंधार हवा असतो. मेंदूला पुनरुज्जीवनासाठी वेळ हवा असतो. पण आजची पिढी जणू स्वतःच्या शरीराशीच स्पर्धा करत आहे. आमच्या लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्ट्या म्हणजे वेगळंच जग होतं. रात्री गच्चीवर झोपायचं. तारांकडे पाहत गप्पा मारायच्या. सकाळी सूर्य उगवण्याआधीच जाग यायची. पक्ष्यांचा आवाज याने दिवस सुरू व्हायचा. अंगात उत्साह असायचा. दिवसभर खेळणं, वाचन, भटकंती, गप्पा यात वेळ जायचा. आज अनेक मुलांना सूर्योदय पाहण्याची सवयच राहिलेली नाही. पहाट म्हणजे काय, सकाळची प्रसन्नता म्हणजे काय, पक्ष्यांचा किलबिलाट म्हणजे काय, याचा अनुभवच त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. आणि याचं दुःख फक्त जुन्या आठवणींचं नाही. त्याचा संबंध त्यांच्या आरोग्याशी, मानसिक स्थितीशी आणि भविष्यातील जीवनशैलीशी आहे. पण आजची पिढी जणू रात्रीला दिवस आणि दिवसाला रात्र मानू लागली आहे. पालक म्हणून आम्ही हे सगळं पाहत असतो.सुरुवातीला आम्ही सांगतो.खूप प्रेमाने सांगतो.नंतर समजावतो.पुन्हा पुन्हा सांगतो.कधी रागावतो.कधी विनवणी करतो.पण आजकाल मुलांकडेही प्रत्येक गोष्टीचं उत्तर तयार असतं. आम्हाला माहिती आहे. तुम्ही काळजी करू नका.

सगळेच असं करतात. आमच्या जनरेशनचं लाइफ वेगळं आहे. ही उत्तरं ऐकताना पालक शांत होतात. पण त्यांचं मन मात्र शांत नसतं. कारण अनुभवाने त्यांना माहीत असतं की शरीरावर अन्याय केला की त्याची किंमत कधीतरी मोजावी लागते. वीस-पंचवीस वर्षांच्या वयात काही परिणाम जाणवत नाहीत. पण सततची अपुरी झोप, अस्थिर दिनचर्या, शारीरिक हालचालींचा अभाव, स्क्रीनचा अतिरेक आणि मानसिक ताण याची छोटी छोटी बीजं नकळत पेरली जात असतात.

उद्या त्याच बीजांचं झाड उभं राहतं.चिडचिड वाढते.एकाग्रता कमी होते.उत्साह हरवतो.नात्यांमध्ये संवाद कमी होतो.आत्मविश्वास डळमळतो.आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जीवनातील साध्या साध्या गोष्टींमधला आनंद हरवायला लागतो. पण पालकांना सर्वात जास्त वेदना या परिणामांची नसते. त्यांना वेदना असते ती आपल्या मुलांपर्यंत पोहोचता न येण्याची. प्रत्येक पिढीला वाटतं की पालक आपल्याला समजून घेत नाहीत. पण सत्य हे आहे की आई-बाबा मुलांना समजून घेण्याचा प्रयत्न आयुष्यभर करत असतात. लहानपणी मुलांच्या रडण्याचा अर्थ समजून घेतात.शाळेतल्या भीतीचा अर्थ समजून घेतात.पहिल्या अपयशाचं दुःख समजून घेतात.पहिल्या प्रेमाची चाहूलही ओळखतात.मुलं काही बोलली नाहीत तरी त्यांच्या चेहऱ्यावरून मनातील गोष्ट वाचतात. मग एक वेळ अशी येते की तीच मुलं मोठी होतात आणि म्हणतात, तुम्हाला काहीच समजत नाही.हे वाक्य पालकांच्या मनाला सर्वाधिक जखम करतं. कारण त्यांना माहिती असतं की त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य मुलांना समजून घेण्यात घालवलं आहे. आई-बाबा मुलांच्या आयुष्यातील शत्रू नसतात. ते त्यांच्या स्वप्नांचे खरे साक्षीदार असतात. त्यांच्या यशासाठी प्रार्थना करणारे पहिले लोक असतात.त्यांच्या अपयशाने आतून तुटणारेही तेच असतात. मुलं आजारी पडली की रात्रभर जागणारे तेच. मुलांना यश मिळालं की स्वतःपेक्षा जास्त आनंदी होणारे तेच. मग ते रात्रभर जागू नकोस असं सांगतात, तेव्हा त्यामागे नियंत्रण ठेवण्याची इच्छा नसते. त्यामागे प्रेम असतं. काळजी असते. अनुभव असतो. आणि एक निःस्वार्थ भीती असते आपल्या मुलाला काही त्रास होऊ नये. पण सतत समजावूनही जेव्हा काही बदल होत नाही, तेव्हा पालक हळूहळू गप्प होऊ लागतात. मुलांना वाटतं की आता त्यांना काही फरक पडत नाही. पण खरं तर त्यांना खूप फरक पडत असतो. फक्त त्यांना कळून चुकलेलं असतं की आता शब्दांची ताकद संपली आहे. आता अनुभवच शिकवणार आहे. हे गप्प होणं म्हणजे हार नाही. तो एक प्रकारचा दुःखी स्वीकार असतो. ज्यादिवशी पालक बोलणं कमी करतात, त्यादिवशी त्यांच्या मनातली काळजी संपलेली नसते. उलट ती आणखी वाढलेली असते. कारण आई-वडील असणं ही अशी अवस्था आहे की मुलं पन्नास वर्षांची झाली तरी त्यांची काळजी संपत नाही. त्यांच्या वयाबरोबर काळजीचं स्वरूप बदलतं, पण काळजी कधीच संपत नाही. म्हणूनच आजच्या मुलांना एक विनंती आहे. आई-बाबांचं प्रत्येक म्हणणं मान्य करा असं नाही. प्रत्येक गोष्टीत त्यांच्याशी सहमत व्हा असंही नाही. स्वतःचे विचार ठेवा. स्वतःचे निर्णय घ्या. स्वतःचं आयुष्य स्वतःच्या पद्धतीने जगा. पण कधीतरी त्यांच्या बोलण्यात दडलेलं प्रेम ऐकण्याचा प्रयत्न करा. कारण आयुष्यात अशी एक वेळ येते, जेव्हा आई-बाबांनी सांगितलेल्या अनेक गोष्टींचा अर्थ अचानक समजू लागतो. आणि मग मनात एकच खंत राहते- हे तेव्हा समजलं असतं तर किती बरं झालं असतं. आजही अनेक घरांमध्ये एखादी आई रात्री उठून मुलाच्या खोलीत डोकावते. एखादा बाबा सकाळी उशिरापर्यंत झोपलेल्या मुलाकडे पाहून न बोलता निघून जातो. ते काही बोलत नाहीत. रागावत नाहीत. वाद घालत नाहीत. पण त्यांच्या मनात एक निःशब्द प्रार्थना सतत सुरू असते देवा, आमच्या मुलांना चांगलं आरोग्य दे. योग्य समज दे. त्यांना सुखी ठेव. आणि जे आम्ही शब्दांत सांगू शकलो नाही, ते त्यांना आयुष्य वेळेवर शिकवो. कारण जगातलं सर्वात निःस्वार्थ प्रेम कोणतं असेल, तर ते पालकांचं. ते कधी उपदेशाच्या रूपात दिसतं. कधी काळजीच्या रूपात. कधी भांडणाच्या रूपात. आणि कधी पूर्णपणे गप्प झालेल्या शब्दांमधूनही ते तितक्याच ताकदीने व्यक्त होत राहतं. त्यांची ही काळजीच त्यांच्या प्रेमाची सर्वात खरी भाषा असते

## राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसाठी मंत्री प्रकाश आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

## कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेची वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत वाढविण्यास तत्त्वतः मान्यता

मुंबई - महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (एनएचएम) केंद्रीय अतिरिक्त सचिव व व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (भाप्रसे.) यांची कर्तव्य भवनमध्ये भेट घेतली. २०२६-२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (पीआयपी) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी ही बैठक महत्त्वाची ठरली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास या बैठकीत तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील अधिकाधिक मुलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. आरोग्य सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या दैनंदिन कामकाजातील विविध ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण व आरोग्यविषयक माहितीचे डिजिटल व्यवस्थापन करण्यासाठी आशा स्वयंसेविकांना मोबाईल फोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आशा स्वयंसेविकांचे प्रोत्साहनपर मानधन वेळेत वितरित करण्यासाठीही केंद्र शासनाकडून निधी वेळेवर मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रम, क्षयरोग निर्मूलनासाठी निक्षय योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण वेळेत मिळण्यासाठी आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून देण्याची; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या नावीन्यपूर्ण आरोग्यविषयक प्रस्तावांना मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मानधन अदा करण्यासाठी अनुदान वेळेवर उपलब्ध करून देणे, तसेच पायाभूत सुविधा कक्ष अंतर्गत प्रलंबित देयके तातडीने मंजूर करण्याबाबत यावेळी आग्रह धरण्यात आला. या बैठकीत महाराष्ट्रातील निदान सेवा अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर विचारविनिमय झाला . तसेच पीएम - एभीम अंतर्गत क्रिटिकल केअर व एकात्मिक सार्वजनिक प्रयोगशाळा साठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत चर्चा झाली. महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून लोकाभिमुख योजना राबवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामध्ये समन्वय वाढवण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी केंद्र शासन सकारात्मक असून, आवश्यक ते सहकार्य मिळेल असा विश्वास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला. बैठकीस राष्ट्रीय आरोग्य अभियान; तसेच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मेंढपाळांची भटकंती थांबविण्याच्या दृष्टीने प्रकल्प राबविण्यासाठी अहवाल सादर करावा-पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

मुंबई- भटकंती करणाऱ्या मेंढपाळांची माहिती संकलीत करुन त्यांची भटकंती थांबविण्याच्या दृष्टीने प्रायोगिक तत्वावर अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन प्रकल्प योजना राबविण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी येथे दिले. राज्यातील मेंढपाळांच्या भटकंती व स्थलांतराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक पार पडली. कृषी मंत्री दत्ता भरणे, आमदार प्रताप अडसड, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पुण्यश्लोक अहिल्याबाई महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शीतलकुमार मुकणे, अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे आदी यावेळी उपस्थित होते. मंत्री मुंडे म्हणाल्या महाराष्ट्रातील बहुतांश मेंढपाळ मेंढीपालन व्यवसायासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत असतात. त्यामुळे त्यांना शिक्षण, आरोग्य, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याने काही ठिकाणी जीवितहानीच्या घटनाही घडतात. या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी अभ्यास अहवाल सादर करावा. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्धबंदिस्त शेळी व मेंढीपालनासाठी आवश्यक पुढील उपाययोजना करण्यात येतील. सध्या 'राजे होळकर महामेष योजना' अंतर्गत वैयक्तिक लाभाची योजना राबविण्यात येत आहे. ही योजना मेंढपाळ बचत गट किंवा सहकारी संस्थांना सामूहिक स्वरूपात दिल्यास एका ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करता येतील. त्यामुळे मेंढपाळांचे वारंवार होणारे स्थलांतर कमी होऊन त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळू शकते, असेही त्यांनी सांगितले. मंत्री भरणे म्हणाले की, मेंढपाळांच्या प्रगतीच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्यातील गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अधिकाऱ्यांना तातडीने पावले उचलावीत.

## राज्यातील एमआरआय, सीटी स्कॅन व पीईटी सीटी स्कॅन प्रकल्पांना गती देणार-वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई- राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राबविण्यात येत असलेल्या एमआरआय, सीटी स्कॅन आणि पीईटी सीटी स्कॅन प्रकल्पांच्या प्रगतीचा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सविस्तर आढावा घेतला. मुंबई आणि नागपूर क्लस्टरमधील विविध प्रकल्पांमध्ये सुरू असलेल्या कामांचा आढावा घेताना रुग्णांना दर्जेदार व अत्याधुनिक निदान सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. एमआरआय, सीटी स्कॅन आणि पीईटी सीटी स्कॅनबाबत मंत्रालयात आढावा बैठक (मुंबई क्लस्टर, नागपूर क्लस्टर) झाली. बैठकीस वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त अनिल भंडारी, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, दूरदृष्य प्रणालीद्वारे तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धुळे, छत्रपती संभाजीनगर, मिरज, कोल्हापूर, बारामती, पुणे, नांदेड, लातूर, सोलापूर, चंद्रपूर, अंबाजोगाई, सिंधुदुर्ग, नागपूर, यवतमाळ, अकोलाचे अधिष्ठाता उपस्थित होते.

# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान; सुरक्षित मातृत्वाला बळकटी देणारे एक दशक

धुळे (जिमाका) – केंद्र शासनाच्यावतीने सन २०१६ पासून राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाच्या दहा वर्षांच्या यशस्वी प्रवासानिमित्त सुरक्षित मातृत्वाला बळकटी देणारे एक दशक हा उपक्रम धुळे जिल्ह्यात उत्साहात राबविण्यात आला. अशी माहिती जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. या अभियानांतर्गत गरोदर मातांना शासकीय आरोग्य संस्थांमध्ये सर्वसमावेशक प्रसूतीपूर्व सेवा उपलब्ध करून देण्यात येतात. यामध्ये तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, सोनोग्राफी सेवा, उच्च जोखमीच्या गर्भावस्थेची ओळख व व्यवस्थापन, रक्त व लघवीच्या आवश्यक तपासण्या, लोह व कॅल्शियम गोळ्यांचे वितरण, टिटॅनस–डिप्थेरिया लसीकरण तसेच पोषण, संतुलित आहार व कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन करण्यात येते. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांच्या नेतृत्वाखाली धुळे जिल्ह्यातील ५५ आरोग्य संस्थांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील २ हजार १७३ गरोदर मातांची प्रसूतीपूर्व तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४६६ उच्च जोखमीच्या गर्भवती माता (क्ळसह ठळीज्ञ झीशसपरपलू) आढळून आल्या असून, त्यांना आवश्यक त्या विशेष आरोग्य सेवा, उपचार व पुढील व्यवस्थापनासाठी संदर्भित करण्यात आले. तसेच सर्व गरोदर मातांना सुरक्षित मातृत्वासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रसूतीपूर्व काळजी व आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बोडके म्हणाले की, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानामुळे गरोदर मातांना दर्जेदार व तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रसूतीपूर्व सेवा उपलब्ध होत आहेत. उच्च जोखमीच्या गर्भावस्था वेळेत ओळखून आवश्यक उपचार केल्यामुळे माता व बालमृत्यू दर कमी करण्यास मदत होत आहे. प्रत्येक गर्भवती महिलेने नियमित तपासण्या करून सुरक्षित मातृत्वासाठी आरोग्य विभागाच्या सेवांचा लाभ घ्यावा. सुरक्षित मातृत्व हा प्रत्येक महिलेचा हक्क असून, आरोग्यदायी माता आणि सुदृढ बालक हे निरोगी समाजाचे प्रतीक आहे. या उद्देशाने आरोग्य विभागामार्फत प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

# अवकाळी पाऊस,वादळी वाऱ्यामुळे बाधित फळपिकांचे पंचनामे त्वरित करा; शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या–कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई– राज्यातील मे व जून २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीमान करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री भरणे बोलत होते. पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले (व्ही.सी.व्दारे), आमदार चंद्रकात पाटील, आमदार अमोल जावळे, कृषि विभागाचे सचिव परिमल सिंह (व्ही.सी.व्दारे), कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषी संचालक (विस्तार) रफीक नाईकवडी, कृषी संचालक विनयकुमार आवटे, जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे, भारतीय कृषी विमा कंपनीचे मुख्य प्रबंधक अजित कुमार, उपव्यवस्थापक अतुल झनकर आदी बैठकीस उपस्थित होते. मंत्री भरणे म्हणाले की, मे आणि जून २०२६ या कालावधीत राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये एकूण ६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापैकी १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण आणि पंचनाम्याची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. विशेषतः ६ जून रोजी झालेल्या पावसामुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले असून त्याचे अचूक मूल्यमापन करणे आवश्यक आहे. जळगाव, बुलडाणा, सोलापूर, पुणे, अकोला आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये मोठ्याप्रमाणात फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. जळगाव जिल्ह्यात मे आणि जून महिन्यात मिळून ७ हजार ५९४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापैकी ७ हजार २१६ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. जिल्हा प्रशासन, कृषी विभाग आणि महसूल विभागामार्फत वेगाने पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. भारतीय कृषी विमा कंपनीकडून नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू असून सर्व पंचनामे पुढील दहा दिवसांत पूर्ण करावेत, असे निर्देशही मंत्री भरणे यांनी दिले.

विमाधारक आणि विमाविहीन शेतकऱ्यांचे नुकसानही अचूक नोंदविण्यात यावे. आवश्यकतेनुसार ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वेक्षण पूर्ण करावे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची मदत वेळेत मिळण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी. महसूल विभागाची मदत घेऊन बाधित शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत. सध्या अनेक शेतकरी अडचणीत असून त्यांना त्वरित मदत मिळणे गरजेचे असल्याचे मंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. बैठकीत राज्यातील बाधित क्षेत्र, पंचनामा स्थिती, केळी पिकावरील परिणाम तसेच पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.

# चर्मकार समाजासाठी संत रोहिदास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

मुंबई– चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) बांधवांना स्वावलंबी बनविण्यासाठी व त्यांच्या आर्थिक उन्नतीला चालना देण्यासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर यांच्या मार्फत सन २०२६–२७ मध्ये विविध शासकीय योजना राबविण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांकडून कर्ज प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. महामंडळामार्फत यंदा '५० टक्के अनुदान योजना' (७ लाभार्थी) आणि 'बीज भांडवल योजना' (१० लाभार्थी' राबविण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पात्र अर्जदारांकडून कर्ज प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्रे, पॅनकार्ड, उद्योग आधार प्रमाणपत्र, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, ग्रामपंचायत,नगरपालिका, महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. व्यवसायासंदर्भातील तांत्रिक प्रमाणपत्र व अनुभवाचा दाखला, आवश्यकतेनुसार प्रकल्प अहवाल, जीएसटी क्रमांक असलेले दरपत्रक जोडवे. शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अर्जदाराचे वारसदारांच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र; तसेच जामीनदारांचे वीज नमुन्यातील शपथपत्र, आधार संलग्न बँक खाते तपशील, सक्षम जामिनदारांची कागदपत्रे आणि बँकेचा सिबिल अहवाल आदी आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) असावा; तसेच त्याने यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या तीन प्रती कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर, गव्हर्नमेंट लेदर वर्किंग स्कूल कंपाऊंड, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१ येथे स्वतः उपस्थित राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसह कर्ज प्रस्ताव दाखल करावेत.

# मिशन लक्ष्यवेध अंतर्गत अमरावतीत कुस्तीसाठी विभागीय क्रीडा निपुणता केंद्र

## १७ जून रोजी खेळाडू निवड चाचणी; पात्र खेळाडूंनी सहभागी होण्याचे आवाहन

मुंबई– मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी विभागीय क्रीडा निपुणता केंद्राची स्थापना अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुलात करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणी १७ जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मोर्शी येथील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी या निवड प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती विभागाचे उपसंचालक (क्रीडा व युवक सेवा) गणेश जाधव यांनी केले आहे. या केंद्रामध्ये निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार आणि तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश–विदेशातील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागाची संधी; तसेच वैद्यकीय विमा संरक्षण अशा विविध सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. निवड चाचणीसाठी २५ वर्षांखालील मुले व मुली पात्र असून, त्यांनी जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, शाळा किंवा महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र तसेच पालकांचे संमतीपत्र यांसह उपस्थित राहावे, असही कळविण्यात आले आहे. राज्यस्तरीय पदक विजेते अथवा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंच्या मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. त्यांना क्रीडा कौशल्य व शारीरिक तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र ठरणे आवश्यक राहील; तसेच शासनमान्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. संजय तिरथकर (९४२२८३८२३७), डॉ. रणवीरसिंग राहल – कुस्ती (७०२०४९१०४५), श्री. अनिल इंगळे (९९७००७११७२) किंवा श्री. अनुप वानखेडे (९८८१९८०२८२) यांच्याशी संपर्क साधावा, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# अकोला पीक विमा प्रकरणाचा तपासणी अहवाल सादर करा–कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई– अकोला जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगाम २०२३–२४ आणि खरीप हंगाम २०२४–२५ मधील पीक विमा भरपाई संदर्भातील तक्रारींचा जिल्हाधिकारी यांचा अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश देत या प्रकरणासंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकींचे इतिवृत्त मागवून चौकशी करण्याचे आदेश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाला दिले. खरीप व रब्बी हंगाम २०२३ – २४ व खरीप हंगाम २०२४–२५मधील एचडीएफसी इरगो इन्श्युरन्स कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणेबाबत मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषीमंत्री भरणे बोलत होते. बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, कृषी राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, आमदार हरीष पिंपळे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, (व्ही.सी.व्दारे) कृषी आयुक्त सुरज मांढरे, कृषि संचालक विनयकुमार आवटे, अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना, पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी बाळासाहेब गोपाळ, भारतीय किसान संघाचे प्रांत उपाध्यक्ष राहुल राठी आदी उपस्थित होते.

### (पान १ वरून) महाराष्ट्र लोकसेवा हक्क...

शपथपत्र घेण्याची तरतूद कमी करुन स्वयं–घोषणापत्र) घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. शासनाद्वारे आपले सरकार पोर्टलवर करण्यात आलेल्या बदलांमुळे नागरिकांना महसुली प्रमाणपत्र मिळणेकामी सुलभता निर्माण झाली असून आता दाखल होणारे अर्ज आधार प्रमाणित पध्दतीने ओटीपीची पडताळणी करुन अर्जदार अथवा आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत दाखल करुन घेण्यात येत आहेत. नागरिकांना सुलभ सेवा उपलब्ध करुन देणेकामी शहरी भागात प्रत्येक वार्डात व महानगरपालिका व नगरपरिषद तसेच नगर पंचायत क्षेत्रात आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करण्यात आले आहेत. तसेच ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात आवश्यक मापदंडानुसार आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करण्यात आले असून प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात देखील आपले सरकार सेवा केंद्र मंजूर करण्यात आले आहे. जेणेकरुन नागरिकांना स्थानिक गावापातळीवर महसुली सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आपले सरकार सेवा केंद्राद्वारे नागरिकांना महसुली सेवा उपलब्ध करुन देण्यात येत असून याकामी नागरिकांकडून शासकीय शुल्कापेक्षा जास्तीची रक्कम आपले सरकार सेवा केंद्रचालकांनी मागणी केल्यास किंवा अर्ज दाखल केल्याबाबत पावती न दिल्यास किंवा स्थानिक आपले सरकार सेवा केंद्रचालकांनी सेवा देण्यास टाळाटाळ केल्यास तसेच लोकसेवा हक्क आयोग अधिनियम २०१५ अंतर्गत निश्चित केलेल्या कालावधीत सेवा न दिल्यास त्यासंबंधी नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे येथे किंवा ९३२५५७००७५ या व्हॉटसप क्रमांकावर तक्रार करावी. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी केले आहे.

# धुळे जिल्ह्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत–पालकमंत्री जयकुमार रावल

## जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक संपन्न

धुळे (जिमाका) – आकांक्षित धुळे जिल्ह्यात जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. पालकमंत्री श्री. रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक झाली. त्यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी खासदार डॉ.शोभा बच्छाव, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, आमदार श्रीमती मंजुळा गावित, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, सहायक नियोजन अधिकारी संतोष वानखेडे, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त देविदास नांदगावकर यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, यंदाच्या जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या निधीचा प्रभावी वापर करून विकास कामे वेळेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सर्व तालुक्यातील लोकप्रतिनिधीशी समन्वय साधून विकासकामांचे नियोजन, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि गुणवत्ता राखून विकास कामे पूर्ण करावीत. सर्व तालुक्यातील विकासकामे होतील यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनपूर्वक आणि समन्वयाने कामे करावे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळावा तसेच कृषी मालाचे स्थानिकस्तरावर मूल्यवर्धन व्हावे यासाठी जिल्ह्यात मिलेट, सोलर, कृषीवर आधारीत फूड प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यावर भर देण्यात यावा. जिल्हा वार्षिक योजनेतून राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजनासाठी लोकप्रतिनिधींना आमंत्रित करावे. जिल्ह्यात वन विभागाने वृक्ष लागवड करीत वनाच्छादान वाढवावे. जिल्ह्यातील बंधारे, प्रकल्प, धरणामधील गाळ काढण्यात यावा. नवीन शाळांचे बांधकाम करतांना स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी अशा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. प्रत्येक तालुक्यात वीज प्रतिबंधक यंत्रे बसविण्यात यावेत.पुनर्वसित गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियमित आढावा घेण्यात यावा. तालुकास्तरावर समन्वय समितीची बैठक घेण्यात यावी. संपूर्ण जिल्ह्यात वन पर्यटन विकास, इको टुरिझमचे कामे करावीत. सर्व शासकीय कार्यालये, शाळा,आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सौर संयंत्र बसविण्यात यावेत. असेही निर्देश पालकमंत्री श्री.रावल यांनी दिले. यावेळी खासदार डॉ. बच्छाव, आमदार श्री.पटेल , आमदार श्री.पावरा, आमदार श्रीमती गावित यांनी विविध विषयांच्या चर्चेत सहभाग घेऊन विविध सूचना केल्या. जिल्हा नियोजन अधिकारी श्री. सोनार, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी श्री. पवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त श्री. नांदगावकर यांनी सादरीकरण केले. या बैठकीत २२ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता, जिल्हा वार्षिक योजना सन २०२५–२०२६ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे, तसेच जिल्हा वार्षिक योजना मार्च, २०२६ अखेर खर्चास मान्यता देण्यात देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२६–२७ (सर्वसाधारण योजना, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजना) च्या खर्चाचे नियोजनावर चर्चा करण्यात आली.

## सागरी मत्स्यव्यवसाय प्रशिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू
## मच्छीमार युवकांना सहा महिन्यांचे विशेष प्रशिक्षण

मुंबई– राज्यातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राचा विकास आणि विस्तार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागामार्फत 'सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन' या सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या १३६ व्या सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, वर्सोवा, मुंबई येथे आयोजित करण्यात येणार असून इच्छुक मच्छीमार युवकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये नौकानयनाची मूलतत्त्वे, सागरी डिझेल इंजिनच्या विविध भागांची माहिती, देखभाल व दुरुस्ती; तसेच आधुनिक मासेमारी साधनांचा वापर यांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. जुलै ते डिसेंबर २०२६ दरम्यान प्रशिक्षण – हे प्रशिक्षण १ जुलै २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत चालणार आहे. प्रशिक्षणासाठी दारिद्र्यरेषेखालील प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रतिमहिना १०० रुपये, तर इतर प्रशिक्षणार्थ्यांकडून ४५० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे.

पात्रतेचे निकष – प्रशिक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे : उमेदवार हा कार्यशील मच्छीमार व प्रकृतीने सुदृढ असावा. वय १८ ते ३५ वर्षे दरम्यान असावे. पोहता येणे आवश्यक. किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा. मासेमारीचा किमान दोन वर्षांचा अनुभव असावा. आधारकार्ड अथवा बायोमेट्रिक ओळखपत्र असणे आवश्यक. विहित नमुन्यातील अर्जास संबंधित मच्छीमार संस्थेची शिफारस जोडणे आवश्यक. दारिद्र्यरेषेखालील अर्जदारांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करावे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत इच्छुक मच्छीमारांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज संबंधित मच्छीमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई – ६१ येथे १९ जून २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क – अधिक माहितीसाठी श्री. विजय कोळगे, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी (मो. ८७७९८३९७४३) तसेच जयहिंद सुर्यवंशी, यांत्रिकी निर्देशक (मो. ७५०७९८८५५२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्राला चालना – राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे किनारपट्टी भागातील युवकांना तांत्रिक कौशल्य प्राप्त होऊन रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सुरक्षित नौकानयन आणि इंजिन देखभालीचे प्रशिक्षण मिळाल्याने मत्स्यव्यवसाय क्षेत्र अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक होण्यास मदत होणार आहे.

## प्रधानमंत्री मोदी यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### प्रधानमंत्र्यांचे दीर्घ सेवेबद्दल महाराष्ट्राच्या वतीने अभिनंदन

नवी दिल्ली– नव्या आत्मनिर्भर भारताच्या उभारणीमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्थान अढळ असून त्यांच्या बारा वर्षांच्या कारकिर्दीत महाराष्ट्राच्याही विकासाला नवी क्रांतिकारी दिशा मिळाली, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले. देशाचे निर्वाचित प्रधानमंत्री म्हणून सर्वाधिक काळ सलग सेवा देण्याचा ४ हजार ३९९ दिवसांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केल्याबद्दल श्री. मोदी यांचे मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या वतीने अभिनंदन केले आहे. मुख्यमंत्र्यांनी आज नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात माध्यमांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्री मोदी यांच्या कारकिर्दीचे ४ हजार ३९९ दिवस हे केवळ कालगणनेतील आकडे नसून हा कालावधी भारताच्या सर्वांगीण विकासाचे एक महत्त्वपूर्ण पर्व असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, या कालावधीत देशातील कोट्यावधी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्याचे महत्त्वाचे कार्य झाले. देशात रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ, द्रुतगती महामार्ग आणि आधुनिक पायाभूत सुविधांचे अभूतपूर्व जाळे उभारण्यात आले. भारताने आर्थिक क्षेत्रात मोठी झेप घेत जगातील अग्रगण्य अर्थव्यवस्थांमध्ये स्थान निर्माण केले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी सिंचन प्रकल्पांना चालना देण्यात आली, जलसंधारण आणि कृषी विकासासाठी विक्रमी गुंतवणूक करण्यात आली. 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असल्याचे चित्र आज देशभर दिसून येते. संरक्षण क्षेत्रात भारताने आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत जगासमोर आपली क्षमता सिद्ध केली आहे. एकेकाळी शस्त्रास्त्रांची मोठ्या प्रमाणात आयात करणारा भारत आज हजारो कोटी रुपयांची संरक्षण सामग्री निर्यात करणारा देश ठरला आहे. यूपीआय आणि डिजिटल पेमेंट प्रणालीच्या माध्यमातून भारताने जगासमोर डिजिटल क्रांतीचा आदर्श निर्माण केला आहे. 'विकास भी और विरासत भी' या ध्येय वाक्याला केंद्रस्थानी ठेवून पंतप्रधान मोदी यांनी विकास आणि सांस्कृतिक वारसा यांचा समतोल साधण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे भारताच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. महाराष्ट्राला गेल्या बारा वर्षांत प्रधानमंत्री मोदी यांचे भरीव सहकार्य लाभल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील अनेक महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्प, वाढवण बंदर, महामार्गांचे विस्तृत जाळे, मेट्रो प्रकल्प, रेल्वे आधुनिकीकरण, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांना केंद्र सरकारकडून मोठा पाठिंबा मिळाला आहे. पूर्वी केवळ कागदावर असणारे प्रकल्प आज प्रत्यक्षात साकार होताना दिसत आहेत. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या पाणीटंचाईचा प्रश्न सोडवताना दाखवलेली संवेदनशीलता खरोखरच कौतुकास्पद आहे. २०१५ च्या भीषण दुष्काळात त्यांनी विशेष लक्ष देऊन 'जलयुक्त शिवार' सारख्या योजनांना बळ दिले आणि विदर्भ व मराठवाड्यातील १०० प्रलंबित धरण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला.अशा प्रकारे आपल्या राज्याच्या समस्यांवर इतक्या संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करणारा नेता मिळणे, हे महाराष्ट्राचे भाग्यच म्हणावे लागेल, अशी भावना व्यक्त करताना महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनतेच्या वतीने मी आपल्या लाडक्या आणि लोकप्रिय पंतप्रधानांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो तसेच त्यांच्या निरोगी, दीर्घ आणि यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करतो, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री मोदी यांचे अभिनंदन केले. राज्य सरकारने ५६ लाख शेतकऱ्यांसाठी ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली आहे. यामध्ये यापूर्वी कर्ज घेतलेले आणि सध्या थकीत असलेले सर्व शेतकरी समाविष्ट असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री म्हणाले, केवळ २०२० मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या आणि पुन्हा थकीत झालेल्या काही शेतकऱ्यांबाबत काही अटी लागू करण्यात आल्या आहेत. अशा शेतकऱ्यांची संख्या सुमारे ९ ते १० लाखांच्या आसपास आहे. त्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.मात्र, वारंवार२०२० मध्ये पुन्हा मिळाली आणि त्यानंतर २०२६ मध्येही कोणत्याही अटींशिवाय कर्जमाफी दिली गेली, तर बँकिंग व्यवस्था कोलमडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळावी आणि बँकिंग व्यवस्थाही सक्षम राहावी, या दोन्ही बाबींचा विचार करून काही मर्यादित अटी घालण्यात आल्या आहेत. मात्र या अटींमुळे ९९ टक्के शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही. सर्व पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली जावी ही आमची स्पष्ट भूमिका आहे. कर्ज कोणत्या वर्षी घेतले याचा विचार न करता दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी पूर्णपणे दिली जाणार आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन राज्यात खतांसंदर्भात काही निर्बंध ठेवण्यात आले आहेत. कारण आपण बहुतांश खते आयात करतो. त्यामुळे अमर्याद प्रमाणात खतांची उपलब्धता करून देणे शक्य नाही, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री म्हणाले, सध्या शेतकऱ्यांच्या गरजेनुसार पुरेशी खते उपलब्ध आहेत. मात्र, कोणी खतांचा अनावश्यक साठा करून ठेवला तर कृत्रिम टंचाई निर्माण होऊ शकते. हे टाळण्यासाठी काही निकष, तसेच अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत, जेणेकरून प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक तेवढे खत उपलब्ध होईल.विशेषतः मिश्र खतांच्या बाबतीत सध्या गरजेनुसार पुरेसा साठा उपलब्ध आहे. एखाद्या शेतकऱ्याला विशिष्ट प्रकारचे खतच हवे असल्यास काही प्रमाणात अडचण जाणवू शकते; मात्र एकूणच खतांचा पुरेसा साठा करण्यात आलेला असून शेतकऱ्यांनी चिंता करण्याचे कारण नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)